Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919



## संक्षिप्त

### १५ पासून मेंदू स्कॅन, स्ट्रोक शिबिर

**चिपळूण :** डेरवण येथील बालावलकर रुग्णालयात १५ व १६ नोव्हेंबर रोजी पहिल्यांदाच सेरेब्रल ॲजिओग्राफी व स्ट्रोक व्यवस्थापन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरासाठी मुंबई येथील डॉ. नितीन डांगे , डॉ. कुशल भाटिया , डॉ. मयूर घरात इत्यादी तज्ज्ञ डॉक्टर्सची टीम रुग्णालयात येणार आहे. रेडिओलॉजी विभाग व न्यूरोसर्जरी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित केले जाणार आहे. या शिबिराबद्दल माहिती देताना प्रमुख रेडिओलॉजिस्ट डॉ. नेताजी पाटील म्हणाले, ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना वेळेत मेंदू स्कॅन किंवा स्ट्रोक उपचार मिळत नाहीत म्हणून बालावलकर रुग्णालयाने हे शिबिर आयोजित केले आहे. पूर्वी अशा क्लिष्ट जोखमीच्या शस्त्रक्रिया केवळ मुंबई किंवा पुणे याठिकाणी केल्या जात होत्या. आता बालावलकर रुग्णालात अशा क्लिष्ट शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा जनआरोग्य योजनेतर्गत मोफत केल्या जाणार आहेत.

### पखवाज प्रथमा परीक्षेत प्रथम श्रेणीत

**राजापूर :** भारतीय संगीत कलापीठ मुंबई यांच्या वतीने आयोजित पखवाज प्रथमा परीक्षेत फ्लॅरश आर्ट ॲकेडमी जैतापूर यांच्या माध्यमातून प्रशिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीने उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेला एकूण सात विद्यार्थी सहभागी झाले होते. ही परीक्षा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ (आंदुर्ले) येथील श्री जगन्नाथ संगीत विद्यालय या केंद्रावर पार पडली. प्रशिक्षण वर्गाचे प्रशिक्षक राजापूर येथील तन्मय परब असून त्यांनी सातही विद्यार्थ्यांना पखवाज या भारतीय तालवाद्याचे मूलभूत आणि प्रगत शिक्षण दिले आहे. या परीक्षेसाठी फ्लॅरश आर्ट ॲकेडमीचे संचालक राकेश दांडेकर, राजन लाड, अरविंद लांजेकर यांचे सहकार्य लाभले होते. कुडाळ येथील श्री जगन्नाथ संगीत विद्यालयाचे संचालक व अलंकार पदवीधर महेश सावंत यांनी परीक्षेला उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांना नुकतेच जैतापूर येथे प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी रत्नागिरी नागरी संरक्षण दलाचे सहाय्यक उपनियंत्रक आनंदसिंग गढरी, मास्टर ट्रेनर अक्षय जाधव, पत्रकार राजन लाड, जब्बार काझी, जैतापूर ग्रामपंचायत सदस्य रुमेश करगुटकर, सिकंदर करगुटकर, प्रशिक्षक तन्मय परब आदी उपस्थित होते.

### धनंजय कीर लेख स्पर्धा जाहीर

**रत्नागिरी:** थोर चरित्रकार पद्मभूषण डॉ. धनंजय कीर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने जिल्हास्तरीय लेख स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयीन गट आणि खुला गट अशा दोन विभागांमध्ये ही स्पर्धा होणार असून, यशस्वी स्पर्धकांना आकर्षक रोख बक्षिसे आणि सहभाग प्रमाणपत्रे प्रदान केली जाणार आहेत. लेख पाठवण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर आहे. महाविद्यालयीन गटासाठी विषय संत साहित्य आणि समाज संघटन, युवक आणि राष्ट्रविकास, स्वदेशी, स्वातंत्र्य आणि सावरकर, राष्ट्रवादी कविता आणि सावरकर, तर खुल्या गटासाठी चरित्र, चारित्र्य आणि राष्ट्रनिर्माण, स्वातंत्र्यलढ्यातील विचारधारा आणि सुराज्य, पद्मभूषण डॉ. धनंजय कीर यांचे चरित्रलेखन, ग्रामविकास ते राष्ट्र विकास हे विषय आहेत. लेखाची शब्द मर्यादा १००० ते १२०० असून, लेख स्वहस्ताक्षरात किंवा टंकलिखित असावा. लेखावर स्पर्धकाची ओळख कुठेही नमूद नसावी. स्पर्धकांनी आपले संपूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक स्वतंत्र कागदावर जोडून द्यावा असे आवाहन करण्यात आले आहे . जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष श्रीकृष्ण गजानन साबणे यांनी जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी आणि साहित्यप्रेमी नागरिकांना या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### श्रद्धा घाडे यांचा राजीनामा

**गुहागर :** गुहागर नगरपंचायत निवडणूक जाहीर झाली असतानाच गुहागरमध्ये भाजपला एक मोठा धक्का बसला आहे. भाजपच्या माजी महिला तालुका अध्यक्ष श्रद्धा घाडे यांनी आपल्या सर्व पदासह सदस्य पदाचा राजीनामा दिला. काही दिवसांपासून गुहागर शहरातील भाजपच्या कार्यक्रमांना त्यांना जाणूनबुजून डावलण्यात येत होते.

# कोकण रेल्वेचे विलिनीकरण लवकर व्हावे : मिश्रा

## रेल्वे कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी १७ नोव्हेंबरला निदर्शने

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

सर्वसामान्य प्रवासी जनतेच्या फायद्याच्या दृष्टीने कोकण रेल्वेचे भारतीय रेल्वेत लवकरात विलिनीकर व्हावे, अशी अपेक्षा ऑल इंडिया रेल्वे फेडरेशनचे महामंत्री कॉ. शिवगोपाल मिश्रा यांनी बुधवारी येथे पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केली. रेल्वे कर्मचाऱ्यांना आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यासह कर्मचाऱ्यांचा प्रवास भत्ता, कर्मचाऱ्यांच्या कामाचे तास, त्यांचे भत्ते, रात्र ड्युटी भत्ता या व अशा प्रलंबित मागण्यांसाठी येत्या १७ नोव्हेंबर रोजी अ. भा. स्तरावर निदर्शने करण्यात येणार असल्याची माहिती श्री. मिश्रा यांनी यावेळी दिली.

नॅशनल रेल्वे मजदूर युनियनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय अधिवेशनाचे उद्घाटन बुधवारी कोकण रेल्वे स्थानकाजीक झाले. यानिमित्ताने ऑल इंडिया रेल्वे फेडरेशनचे महामंत्री कॉ. शिवगोपाल मिश्रा हे रत्नागिरी येथे आले होते. यावेळी ऑल इंडिया रेल्वे फेडरेशनचे जे. आर. भोसले, नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे जनरल सेक्रेटरी वेणू पी. नायर यांच्यासह एनआरएमयूचे स्थानिक पदाधिकारी कुमार घोसाळकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

**रत्नागिरी : रेल्वे कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसह कोकण रेल्वच्या विलिकरणाबाबत भूमिका स्पष्ट करताना ऑल इंडिया रेल्वे फेडरेशनचे महामंत्री कॉ. शिवगोपाल मिश्रा, सोबत नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे जनरल सेक्रेटरी वेणू पी. नायर.**

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना श्री. मिश्रा म्हणाले की, रेल्वे कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात केंद्र सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी येत्या दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी निदर्शने केली जाणार आहेत. या आंदोलनादरम्यान सर्वसामान्य प्रवाशांना कोणताही त्रास होणार नाही, अशा मागनि ऑल इंडिया रेल्वे फेडरेशन लक्ष वेधून घेणार आहे.

येत्या दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी उत्तर प्रदेशात संघटनेचे अधिवेशन होणार असल्याची माहिती देखील ऑल इंडिया रेल्वे फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांकडून यावेळी पत्रकारांना देण्यात आली. नॅशनल रेल्वे मजदूर युनियनच्या रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय अधिवेशनात रेल्वे कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांचा उहापोह करण्यात आला.

यावेळी कोकण रेल्वेचे रखडलेल्या विलीनीकरणासंदर्भात बोलताना श्री. मिश्रा म्हणाले की, प्रकल्पाच्या उभारणीत हिस्सा असलेल्या महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक तसेच केरळ या राज्यांनी कोकण रेल्वे महामंडळ भारतीय रेल्वेत विलीन व्हावे, यासाठी केंद्र सरकारकडे या आधीच होकार दर्शनवला आहे. या प्रकल्पाच्या उभारणीत सर्वाधिक वाटा असलेल्या महाराष्ट्र शासनाने कोकण रेल्वे भारतीय रेल्वेत विलीन करावी म्हणून केंद्रला प्रस्ताव दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तसा प्रस्ताव पाठवलेला असताना आणि विलीनीकरण करण्यासाठी कोणताही मोठा अडथळा नसल्याने आता तातडीने विलीकरण व्हावे, अशी अपेक्षा श्री. मिश्रा यांनी व्यक्त केली.

# सिंधुदुर्ग-कोल्हापूर सीमेवरील 'ओंकार' हत्तीला 'वनतारा'मध्ये पाठवा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सिंधुदुर्ग-कोल्हापूर जिल्हा सीमेवरील 'ओंकार' हत्तीला तात्पुरते गुजरातमधील 'वनतारा' सेंटरमध्ये पाठवा. तसेच, उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त करून पुढील कार्यवाही करा, असे आदेश कोल्हापूर सर्किट बेंचच्या डिव्हिजनल बेंचने बुधवारी दिले. न्यायमूर्ती मकरंद कर्णिक आणि न्यायमूर्ती अजित कडेठणकर यांनी हा निकाल दिला.

सिंधुदुर्ग व कोल्हापूर जिल्ह्यातील सीमेजवळ फिरत असलेल्या 'ओंकार' नावाच्या हत्तीबाबत प्रा. रोहित कांबळे यांनी ९ ऑक्टोबर २०२५ रोजी सर्किट बेंचमध्ये जनहित याचिका दाखल केली होती. प्रा. कांबळे, ॲड. उदय वाडकर, ॲड. केदार लाड यांनी युक्तिवाद केला. सरकारी पक्षातर्फे ॲड. टी. जे. कापरे यांनी बाजू मांडली.

वाईल्ड लाईफ प्रोटेक्शन ॲक्ट १९७२ नुसार एखाद्या हत्तीने मानवाच्या जीवितास धोका निर्माण केला किंवा हत्ती स्वतः आजारी असेल, तर नागपूरमधील मुख्य वनसंरक्षक यांच्या अहवालानुसार, एखाद्या ठिकाणाहून दुसरीकडे हलवू शकतात. 'ओंकार' हत्ती दोडामार्ग परिसरात मानवी वस्तीत घुसल्याने त्याला

**कोल्हापूर सर्किट बेंचचे आदेश**

पकडून गुजरातमधील 'वनतारा'मध्ये पाठविण्याचे प्रयत्न सुरू होते. त्याला प्रा. कांबळे यांनी जनहित याचिका दाखल करून हरकत घेतली होती.

प्रा. कांबळे, ॲड. वाडकर, ॲड. लाड यांनी कलम १२ नुसार हत्तीचा अधिवास बदलायचा असेल, तर केंद्र सरकारची मान्यता घ्यावी लागते, 'ओंकार' हत्तीला कोल्हापूर वन विभागाच्या हद्दीतील नैसर्गिक अधिवासातच सोडा, कोल्हापूर वन विभागाच्या हद्दीतील आठ हत्तींचा यापूर्वी मृत्यू झाला असून, त्याची चौकशी व्हावी, 'ओंकार' हत्तीला पकडण्याची मोहीम थांबवा, तसेच 'ओंकार' हत्तीला चांदोली अभयारण्य, राधानगरी अभयारण्य, कोयना अभयारण्य, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात पाठवावे, अशी मागणी केली होती. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी 'वनतारा'शिवाय इतरत्र व्यवस्था नाही, त्यामुळे 'ओंकार' हत्तीला 'वनतारा'मध्येच पाठवा, असे सांगितले. सरकारी वकील कापरे यांचा युक्तिवाद आणि

सर्वोच्च न्यायालयातील काही न्यायनिवाडे यानुसार 'ओंकार' हत्तीला तात्पुरते गुजरातमधील 'वनतारा'मध्ये पाठवा, असे आदेश न्यायमूर्तींनी दिले.

# धामणीत दुचाकी अपघातात गायीचा मृत्यू ; दोघे गंभीर

**देवरुख : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई -गोवा राष्ट्रीय महामार्गावरील धामणी येथे भरधाव वेगात येणाऱ्या दुचाकीस्वाराने गाईला जोरदार धडक दिल्याने या अपघातात गाय जागीच गतप्राण झाली तर दुचाकीवरील दोघेजण गंभीर जखमी झाले आहे. अपघाताची घटना मंगळवारी रात्री वाजण्याच्या सुमारास घडली.

राष्ट्रीय महामार्गावरून संगमेश्वरच्या दिशेने योगेश रामदास चव्हाण (३०, सातारा, सध्या रा. वांद्री), रोहित मोहन चव्हाण (२५, सातारा सध्या रा. वांद्री) दुचाकीवरून येत असताना धामणी येथे रस्त्यावर अचानक गाय आडवी आल्याने दुचाकी चालक घाबरून गेल्याने दुचाकीचालकाचा दुचाकीवरील नियंत्रण सुटून दुचाकी थेट गाईला जाऊन धडकली.

यात दुचाकीवरील दोघेजण रस्त्यावर पडले. दुचाकीची गाईला बसलेली धडक एवढी जबरदस्त होती की गाय काही अंतरावर पडली व तेथेच तिचा मृत्यू झाला.


**मुरबाड, नगर पंचायत मुरबाड**

मु.पो.ता.मुरबाड, जि.ठाणे-४२१४०१, फोन नं.०२५२४-२२५९०५,
ई-मेल-१) mapmurbad@gmail.com २)coud.murbod@maharashtra.gov.in

जा.क्र./मुनप/बांधकाम विभाग/ई निविदा/१५६५/२०२५ दि.११ /११/२०२५

**ई- निविदा सुचना क्र. २० सन २०२५-२६**

मुरबाड नगरपंचायत, मुरबाड ता. मुरबाड, जि. ठाणे, बांधकाम विभागाच्या "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान" (जिल्हास्तर) या योजनेंतर्गत सन- २०२५-२६ या योजनेंतर्गत ०१ कामांची ई-निविदा नगरपंचायत मुरबाड कडून मागविण्यात येत आहे. कामा संबंधी सविस्तर तपशील mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी सदर निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
मनोज म्हसे
मुख्याधिकारी नगर पंचायत मुरबाड


# रत्नागिरीत न.प.प्रभाग ३ मध्ये दोन उमेदवारी अर्ज दाखल

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

रत्नागिरी नगर परिषदेच्या सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकीत प्रभाग ३मधून मतीन बावानी व हीना बावानी या दांपत्याने दोन उमेदवारी अर्ज अपक्ष म्हणून दाखल केला आहे. दरम्यान हे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उमेदवार असू शकतात अशी चर्चा न.प. वर्तुळात सुरु होती.

उमेदवारी अर्ज भरण्याच्या तिसऱ्या दिवशी बुधवारी प्रभाग ३ ब मधून सर्वसाधारण आरक्षण असलेल्या गटात मतीन याकुब सत्तार बावानी व ३ ब मधूनच हीना मतीन बावानी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. रनप निवडणुकीसाठी प्रथमच उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. बुधवारी निवडणूक निर्णय अधिकारी जीवन देसाई यांच्याकडे या दांपत्याने अर्ज सादर केला. तत्पूर्वी त्यांनी ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण केली. प्रभाग ३ हा शिवसेनेचे नेते राजन शेट्ये यांचा प्रभाग असून त्यांचे याठिकाणी मोठे वर्चस्व दिसून येते. याचप्रभागात बावानी दांपत्याने अर्ज दाखल केला आहे. बावानी दांपत्य हे आघाडीकडून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार असू शकतात अशी चर्चा आता न.प. वर्तुळात सुरु झाली आहे.

# लाडघर किनाऱ्याची 'ब्लू फ्लॅग'साठी निवड

**दापोली : प्रवीण शिंदे**

दापोली तालुक्यातील लाडघर समुद्रकिनारा आता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दिशेने वाटचाल करत आहे. पर्यावरणीय गुणवत्ता, स्वच्छता, सुरक्षितता आणि नैसर्गिक सौंदर्य यासाठी प्रसिद्ध असलेल्या या किनाऱ्याची 'ब्लू फ्लॅग' मानांकनासाठी निवड झाली असून प्राथमिक सुरक्षा आणि पर्यावरणीय ऑडिट प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

'ब्लू फ्लॅग' हे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र जगातील निवडक, पर्यावरणपूरक व सुरक्षित समुद्रकिनाऱ्यांना दिले जाते. या मानांकनासाठी लाडघर किनाऱ्यावर पाण्याची गुणवत्ता, कचरा व्यवस्थापन, बचाव व्यवस्था, पर्यटकांसाठी स्वच्छ शौचालये व प्राथमिक उपचार सुविधा, तसेच किनाऱ्याचे सौंदर्य राखण्यासाठी केलेले प्रयत्न यांची बारकाईने तपासणी करण्यात आली आहे. तपासणीत लाडघर किनाऱ्याने उत्कृष्ट कामगिरी बजावल्याची माहिती मिळाली आहे. 'ब्लू फ्लॅग' मानांकन मिळाल्यास लाडघर किनाऱ्याचे नाव जागतिक दर्जाच्या समुद्रकिनाऱ्यांच्या यादीत झळकणार आहे. त्यामुळे दापोली पर्यटन क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल. विविध सामाजिक संस्था आणि स्थानिक व्यवस्थापन यांच्या संयुक्त प्रयत्नातून लाडघर किनाऱ्याचे सर्वांगीण सुशोभिकरण आणि पर्यावरणीय संवर्धन सुरू आहे. यामुळे केवळ पर्यटनाला चालना मिळणार नाही, तर स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधीही उपलब्ध होणार आहेत.


**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

**ई-निविदा सूचना क्र. का.अ. (शहर) / मुं. झो. सु.मंडळ / ई-निविदा/मससंम/२०/२०२५-२६**

कार्यकारी अभियंता [ शहर ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (दूरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४८४) हे जिल्हा उप निबंधक/शहर/मुंबई शहर जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकूण ०७ कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत निविदा सूचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक १३.११.२०२५ दुपारी ०१.०५ पासून दिनांक २०.११.२०२५ सायंकाळी ५.३५ पर्यंत राहील. निविदा सूचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास https://mahatenders.gov.in, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर) मुं.झो.सु. मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

Follow us @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

CPRO/A/942
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सूचना**

निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/४५२५/प्र.क्र.०२/४२८०/२०२५ दिनांक: १२/११/२०२५

**आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government / State Government / Government undertaking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदारांकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार जाहिर ई-निविदा मागवित आहेत.**

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/192/ 2025-26 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा मधील सेक्टर-०७, प्लॉट नं.०६ येथे पनवेल महानगरपालिका शाळा बांधणे. | ४०,२८,१३,००३/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.१३/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका



**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**
**बांधकाम विभाग**

**ई-निविदा सुचना क्र.१२१ सन २०२५-२६**

खालील काम करण्यासाठी सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ. क्र. | अंदाजित खर्च/निविदा फॉर्म फी/कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रात स्व. परशुराम टावरे क्रिडा संकुलनात असलेले स्व. अलहज शाह मोह. खुदाबक्ष हॉल दुरुस्त करुन रंगरंगोटी करणे. | २९,९८,८३०/- | दिनांक १३/११/२०२५ ते दिनांक २०/११/२०२५ |
| २ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका निवडणूक-२०२५ करिता प्रभाग समिती क्र.०४च्या कार्यक्षेत्रातील कै. परशुराम टावरे क्रिडा संकुल येथे ई.व्ही.एम. गोडाऊन कार्यालयाचे क्षेत्रफळ वाढविणे कामी दुरुस्ती करणे व आरोग्य विभाग, पाणीपुरवठा विभाग कार्यालयाचे दुरुस्ती करणे. | ९,९८,४०२/- | |
| ३ | भिवंडी निजामपूर मनपा क्षेत्रातील वार्ड क्र.१८ मधील माधवनगर या ठिकाणी गटार बनविणे व रस्त्यावर पेव्हर ब्लॉक लावणे व गटारावरील नवीन चेंबर्स लावणे. (मा. खासदार निधी अंतर्गत) | ९,९९,५५०/- | |

सदर निविदा बाबतची माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१३/११/२०२५ ते दि.२०/११/२०२५ रोजी पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा संकेतस्थळावर दि.२०/११/२०२५ रोजी दु. ३.०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येतील.

सही/-
शहर अभियंता
भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.


# रत्नागिरी उपप्रादेशिक कार्यालय आयएसओ मानांकनसाठी पात्र

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

रत्नागिरी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची इमारत, येथील स्वच्छता आणि नीटनीटकेपणा दखल घेण्याजोगे आहे. महाराष्ट्रात असे उपपरिवहन कार्यालय कुठेच नाही. शासनाच्या १०० दिवस कार्यक्रमात रत्नागिरी आरटीओ कार्यालय महाराष्ट्रात पहिले आले आहे. या कार्यालयाला शासनाने आयएसओ मानांकन द्यावी, अशी मागणी आम्ही करणार असल्याचे सेवानिवृत्त परिवहन अधिकाऱ्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील २० सेवानिवृत्त परिवहन आयुक्तांपासून उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी रत्नागिरी आरटीओ कार्यालयाला भेट देवून पाहणी केली. ज्या रत्नागिरी आरटीओ कार्यालयाला महाराष्ट्रातील पहिले पारितोषिक मिळाले त्या कार्यालयाची पाहणी करण्यासाठी २० सेवानिवृत्त अधिकारी आले होते. या सर्व अधिकाऱ्यांचे आरटीओ राजवर्धन करंदे, सहाय्यक आरटीओ अजित ताम्हणकर यांनी केले. यावेळी दिलीप जाधव, शिरीष ठाकूर, सतीश सहस्त्रबुध्दे, प्रसाद महाजन, एल. पी. खाडे, एस. के. पाचरणे, अमरेंद्र पाठक, जितेंद्र पाटील, संजय राउत, प्रकाश जाधव, विलास कांबळे, अशोक शिंदे, सुबोध मेडसीकर, योगेश बाग, कमलेश चव्हाण, सतीश साळवी, रुक्मणीकांत कळमणकर उपस्थित होते.


**प्राइम फोकस लिमिटेड**
PRIME FOCUS LIMITED

सीआयएन : L92100MH1997PLC108981
नोंदणीकृत कार्यालय : प्राइम फोकस हाऊस, सिटी बिझनेस, लिंकिंग रोड, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२.
दूरध्वनी : +९१ २२ २६४८ ४१०० फॅक्स : +९१ २२ ६७१५ ५००१
ई-मेल : ir.india@primefocus.com वेबसाइट : www.primefocus.com

**दि. ३०.०९.२०२५ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा (स्थायी व एकत्रित) अहवाल**

सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ ("सेबी सूची विनियमन") चे विनियमन ३३ यांच्या अनुपालनांतर्गत, दि. ३०.०९.२०२५ रोजी संपलेली दुसरी तिमाही व सहामाहीकरिताच्या कंपनीच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांना (स्थायी व एकत्रित) प्राइम फोकस लिमिटेड च्या ("कंपनी") संचालक मंडळाद्वारेत्यांच्या बुधवार, दि. १२.११.२०२५ रोजी आयोजित त्यांच्या समेमध्ये मंजूरी देण्यात आली आहे.

सर्वाधित पुनरावलोकन अहवालासमवेत सदर वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाइट https://www.primefocus.com/financial-results-conclusion-meeting-board-directors वर तसेच कंपनीचे शेअर्स सूचिबद्ध असलेले स्टॉक एक्सचेंज नाम बीएसई लिमिटेड www.bseindia.com व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड वेबसाइट www.nseindia.com वरही उपलब्ध असून क्यूआर कोड स्कॅन करुनही ते प्राप्त करता येऊ शकतील.

प्राइम फोकस लिमिटेड करिता
सही/-
जेरा म्हाडोरा
अध्यक्ष व पूर्णवेळ संचालक
डीआयएन : ०००००४५१

दिनांक : १२.११.२०२५
ठिकाण : मुंबई

टीप : वरील माहिती ही सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ४७ अंतर्गत आहे.


Nk Daily News Mumbai Whatsapp Group +91 96879 19919